I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154184

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य / State: महाराष्ट्र, जिल्हा / District: मुंबई, पोलीस ठाणे / Police Station: ............, पहिली खबर क्र. / FIR No.: 28, वर्ष / Year: 2022, दिनांक / Date: 6/8/2022

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections: 7, 7(अ)
(ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार / Occurrence of offence : Day: सोमवार, तारीख पासून / Date from: 10/7/22, वेळ / Time: 8.30, तारीख पर्यंत / Date to: 6/8/22, वेळ / Time: 14.10

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची / Information received at P. S.: तारीख / Date: 10/7/2022, वेळ / Time: 8:30

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference : Entry No.: 02/2022, तारीख / Date: 6/8/2022, वेळ / Time: 4.00 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी तक्रार अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा / Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. / Chouki / Beat / O.P. Name and No.: 4 पश्चिम 6 कि.मी.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव / Address of Occurrence Name: रुम नं. 18, ठिकाणाचे नंबर: पहिला, गल्ली: मजला, रस्त्याचे नाव / Name of road: जी वार्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका,
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable place: जे. जे. रुग्णालय समोर, गाव / Village ......, पोस्ट / Post ......, तालुका / Taluka: डोंगरी, जिल्हा / Dist.: मुंबई-8, राज्य / State ......

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव / In case, outside the limit of this Police Station ............, तालुका / Taluka ......, जिल्हा / Dist. ......, राज्य / State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव / Name: विनोद
(b) वडिलांचे / पतीचे नाव / Father's / Husband's Name: गोविंद परब
(c) जन्म तारीख व वय / Date of Birth and Age: 31/12/1968, 53 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व / Nationality: भारतीय, फोन नं. / Phone No.: 8820068699
(e) पारपत्र क्रमांक / Passport No. ............, दिल्याचा दिनांक / Date of Issue ............, दिल्याचे ठिकाण / Place of Issue ............
(f) व्यवसाय / Occupation: केटरींग, हॉटेल व्यवसाय
(g) धर्म Religion ......, जात Caste ......, जनजाति Sub-Caste ......
(h) पत्ता / Address: 22 प, 3206, प्रभाग क्रो. ऑ. हौ. सोसायटी, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-33
गल्ली / सर्वे नं. / Ward ......, घर / गाव नं. / House Name No. ......, फोन / मो. नं. / Phone/Mo. No. ......, पॅन नं. / PAN No. ......, कार्ड नं. / Card No. ......
रस्त्याचे नाव / Road ......, जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place ......, गाव / Village ......, पोस्ट / Post ......, पो. स्टे. / P. Stn. ......
तालुका / Taluka ......, जिल्हा / Dist. ......, राज्य / State ......, सध्याचा पत्ता / Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असलेल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व रं. अग्नियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

1) संदीप रविंद्र गायकवाड, वय - 48 वर्षे, व्यवसाय - वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पत्ता - रुम नं 11, 12 इमारत क्र-6, बी.आय.टी. वसाहत, 112 निवासी जे.जी. टेमकर मार्ग, वरळी मुंबई.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lys.)-2-2018- PA3-(K) 829

2) सचिन मधुकर कोकिनकर, वय-36 वर्षे, व्यवसाय - खाजगी एजन्ट, पत्ता - बी-804, 8 था मजला, नविन गौरव सोसायटी, डोंबिवली पूर्व, ठाणे.

Scanned with CamScanner

सदरील फिर्यादी श्री विनोद गोविंद परब वय-53 वर्षे. धंदा-कॅशियर, हॉटेल व्यवसाय. रा.रु.-22 ए/3278. प्रकाश को ऑ हौ. सोसायटी, अभ्युदय नगर, काळा चौकी, मुंबई-33 यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असुन तोच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(signature) 7/4/2022

निलिमा के. डोळस.

पोलीस निरीक्षक

भा.प्र.वि, मुंबई.

(signature) 07/04/2022

Scanned with CamScanner

फिर्याद दिनांक – ०७/०४/२०२२

श्री. विनोद गोविंद परब, वय ५३ वर्षे, धंदा – कॅटरिंग (हॉटेल व्यवसाय), रा.ठि.– २२, ए/३२७८, प्रयास को.ऑप.हौ.सो., अभ्यूदय नगर, काळाचौकी, मुंबई – ३३. मो.क्र. ९८२०७६६६११.

.....

मी वरील प्रमाणे नमुद पत्यावर माझ्या कुटुंबियांसमवेत मागील १८ वर्षापासून राहावयास आहे. माझा कॅटरिंगचा व्यवसाय असून, माझे अन्नपूर्णा कॅटरर्स, हे रुम नं.००४, मौर्या बिल्डींग, सुभानराव नलावडे मार्ग, चिंचपोकळी (पूर्व), मुंबई – १२ या ठिकाणी असून सदर व्यवसाय मधून मिळणाऱ्या उत्पनावर कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी सन २०१८ साली श्री. जनार्दन अम्मू देवदीगा यांचेकडून कल्पना हॉटेल, ४५/४७, गिरीराज बिल्डींग, लोखंडबाजार, कर्नाकबंदर, संत तुकाराम मार्ग, मुंबई – ४००००९ हे हॉटेल विकत घेतलेले आहे. त्यानंतर मी 'बी' वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, डोंगरी, मुंबई – ०९ यांच्याकडील जुन्या मालकाच्या नावावर असलेले हेल्थ लायसन्स स्वत:च्या नावावर हस्तांतरीत करणे, हॉटेलचे डिझेल इंधन आधारीत भट्टीचे एल.पी.जी मध्ये रूपांतरीत करणे, हॉटेलच्या पत्त्यामध्ये पिन कोड दुरूस्त करणे इत्यादी कामाकरीता अर्ज केला होता. त्यानंतर मी जानेवारी २०२० मध्ये नमूद कार्यालयातील संबधित वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. संदिप गायकवाड यांना भेटलो असता त्यांनी हेल्थ लायसन्स हस्तांतरीत करणे, तसेच हॉटेलचे डिझेल इंधन आधारीत भट्टीचे एल.पी.जी. मध्ये रूपांतरीत करणे व पिनकोड बदली करण्याकरीता मला लोकसेवक श्री संदीप गायकवाड यांनी रु ५०,०००/– इतक्या रकमेची मागणी केली. त्यावेळी मी सॅनिटायझर इंस्पेक्टर श्री. जावेद काझी यांचे मार्फत रू. ४०,०००/– डॉ. संदिप गायकवाड यांना दिले होते, परंतु वैद्यकिय अधिकारी श्री. संदिप गायकवाड यांनी हॉटेल लायसन्स हस्तांतरण करणे, डिझेल इंधन आधारीत भट्टीचे एल.पी.जी. रूपांतरीत करणे व पिन कोड दुरूस्त करण्याचे कामे केलेली नाहीत.

त्यानंतर मी माहे डिसेंबर २०२१ च्या शेवटच्या आठवडयात सॅनिटायझर इंस्पेक्टर श्री. जावेद काझी यांना जावून भेटलो असता त्यांनी मला माझ्या हॉटेलच्या डिझेल इंधन आधारीत, एल.पी.जी. भट्टीत रूपांतरीत करण्याचे काम कठीन असल्याने माझे लायसन्स मध्ये बदल करणे कठीन होत आहे. त्याकरिता डॉ. संदिप गायकवाड यांनी माझ्याकडे अजून पैशांची मागणी केलेली असून, त्यांनी मला डॉ. संदिप गायकवाड यांना भेटण्याबाबत सूचित केले.

मला डॉ. संदिप गायकवाड यांना पैसे देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दिनांक १०/०१/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे महिला पोलीस निरीक्षक निलीमा डोळस यांचेकडे वैद्यकिय अधिकारी श्री. संदिप गायकवाड आणि सॅनिटायझर इंस्पेक्टर श्री. जावेद काझी यांचे विरुध्द स्व:हस्ताक्षरात मराठीमध्ये तक्रार लिहुन दिली. महिला पोलीस निरीक्षक निलीमा डोळस यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले व माझी पंच व इतर अधिकारी कर्मचारी यांची ओळख करुन दिली.

महिला पोलीस निरीक्षक डोळस हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये म.पो.नि. निलीमा डोळस यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले. त्यानंतर सापळा पथकातील पर्यवेक्षक अधिकारी स.पो.आ. संजु जॉन, व इतर अंमलदार

समक्ष,

(signature)

(निलीमा डोळस),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(signature) 07/04/2022

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. विनोद गोविंद परब यांचा दिनांक ०७/०४/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू.....

यांची ओळख करुन दिली त्यानतर मी, पंच, पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार असे शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून पडताळणीसाठी रवाना झालो.

आम्ही शासकीय वाहने दादाजी कोडदेव मार्गावर जिजामात उद्यान, भायखळा, मुंबई येथे रस्त्यालगत कोणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे वाहने थांबविली. त्यावेळी पो.नि. निलीमा डोळस, यांनी मला व पंच श्री. मनिष जांभळे यांना पडताळणी बाबत योग्य त्या सुचना त्यांनी देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियानला पो.ना यादव याचे मदतीने लावण्यात आला. त्यांनंतर मी व पंच श्री. मनिष जांभळे असे माझ्या खाजगी दुचाकी वाहन क्र. MH-43-AY-2264 या गाडीने लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. सदर दिवशी माझी सॅनिटायझर इंस्पेक्टर श्री. जावेद काझी यांची भेट झाली त्यावेळी त्यांना वैद्यकीय अधिकारी गायकवाड साहेबाबाबत विचारणा केली असता ते त्या दिवशी आले नसल्याचे श्री. काझी यांनी सागितले त्यामुळे मी पुन्हा शासकीय वाहन असलेल्या ठिकाणी परत आलो. सदर दिवशी श्री. गायकवाड साहेबाची भेट झाली नसल्याने म.पो.नि. डोळस यांनी दिनांक ११/०१/२०२२ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात येईल असे सांगून त्यादिवशी पडताळणी स्थगित केली.

दिनांक ११/०१/२०२२ रोजी म.पो.नि. डोळस यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दादाजी कोडदेव मार्गावर जिजामात उद्यान, भायखळा, मुंबई येथे परस्पर पोहचलो. थोडया वेळातच तेथे म.पो.नि. डोळस व पडताळणी पथक शासकीय वाहनाने पोहचले. त्यानंतर म.पो.नि. डोळस यांनी मला व पंच श्री. मनिष जांभळे यांना पडताळणी बाबत योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टाच्या डाव्या खिशाला आतील बाजुस पो.ना यादव याचे मदतीने लावण्यात आला. त्यांनंतर मी व पंच श्री. मनिष जांभळे असे माझ्या खाजगी दुचाकी वाहनाने लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. सदर दिवशी लोकसेवक गायकवाड यांच्याशी प्रत्यक्ष भेट झाली तेथे उपस्थित लोकसेवक काझी यांनी फायर कंम्लायन्स साठी ऑनलाइन अॅपलिकेशन करण्यास सांगितले . सदर दिवशी झालेल्या संभाषणामध्ये लाचेची मागणी त्यांनी माझेकडे केली नाही. तसेच सबंधित शासकीय फि भरण्याकरीता सांगण्यात आल्याने म.पो.नि. डोळस यांनी तक्रारीची पुन्हा परिस्थितीनुसार पडताळणी करण्यात येईल असे सांगून पडताळणी स्थगित केली.

शासकीय फी भरण्याकरीता सांगण्यात आल्याने मी दिनांक १९/०१/२०२२ रोजी रु १२,६९३/— इतकी आनलाईन फी भरली त्यानंतर मी माझे हॉटेलचे हेल्थ लायसन्स हस्तांतरीत करणे, तसेच हॉटेलचे डिझेल इंधन आधारीत भट्टीचे एल.पी.जी. मध्ये रूपांतरीत करणे व पिनकोड बदली होण्याचे काम पूर्ण होईल यांची वाट पाहत होतो. परंतु बराच कालावधी झाल्यानंतर देखील ते काम पूर्ण झाल्याचे मला दिसले नाही. त्यामुळे मी पुन्हा दिनांक २३/०३/२०२२ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात म. पो.नि. डोळस यांची भेट घेतली. त्यामुळे त्यांनी सदर दिवशी पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री. संदिप गायकवाड यांचे कार्यालयात भेटण्याकरीता गेलो असता

समक्ष,

(निलीमा डोळस),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

07/04/2022

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. विनोद गोविंद परब यांचा दिनांक ०७/०४/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू..... 

लोकसेवक श्री संदीप गायकवाड यांची भेट न झाल्याने पडताळणी होवू शकली नाही. त्यामुळे सदर पडताळणी दिनांक २४/०३/२०२२ रोजी करण्यात येईल असे सांगितले.

दिनांक २४/०३/२०२२ ला.प्र.वि. कार्यालयात म.पो.नि. डोळस यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे हजर झालो. सदर दिवशी पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री. संदिप गायकवाड यांचे कार्यालयात भेटण्याकरीता गेलो असता लोकसेवक श्री संदीप गायकवाड यांची भेट न झाल्याने पडताळणी होवू शकली नाही. त्यामुळे सदर पडताळणी दिनांक २५/०३/२०२२ रोजी करण्यात येईल असे सांगितले

दिनांक २५/०३/२०२२ ला.प्र.वि. कार्यालयात म.पो.नि. डोळस यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पुन्हा हजर झालो. सदर दिवशी पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री. संदिप गायकवाड यांचे कार्यालयात भेटण्याकरीता गेलो असता श्री संदीप गायकवाड यांची भेट झाली नाही. परंतु खाजगी इसम नामे सचिन याने लोकसेवक गायकवाड यांच्या करीता रू. ३,०००/— लाचेची मागणी पंचासमक्ष लोकसेवक श्री गायकवाड यांचेकरीता माझेकडे केली, परंतु लोकसेवक श्री गायकवाड यांची प्रत्यक्ष भेट न झाल्याने त्यांनी प्रत्यक्ष लाच मागणी केल्याची मला खात्री झाले नाही. त्यामुळे मी केलेल्या तक्रारीची पुन्हा परीस्थितीनुसार दिनांक २८/०३/२०२२ रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून म.पो.नि. डोळस यांनी सांगून पडताळणी स्थगित केली.

दि. २८/०३/२०२२ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात म.पो.नि. डोळस यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पुन्हा हजर झालो. सदर दिवशी पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री. संदिप गायकवाड यांचे कार्यालयात भेटण्याकरीता गेलो असता श्री संदीप गायकवाड यांची भेट झाली. परंतु त्यांच्याकडुन मला पैशाच्या स्वरुपात लाचेची मागणी झाली नाही, त्यामुळे तक्रारीची पुन्हा परीस्थितीनुसार दिनांक २९/०३/२०२२ रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे म.पो.नि. डोळस यांनी सांगितले.

दि. २९/०३/२०२२ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात म.पो.नि. डोळस यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पुन्हा हजर झालो. सदर दिवशी पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगितले. परंतु सदर पडताळणी कारवाई ही मोबाईलवर फोन लावुन स्पिकर ऑन करून केली जाणार असल्याचे सांगितले त्यामध्ये लोकसेवक श्री जावेद काझी यांचा मो.नं.९८२१५८१७६८ व खाजगी इसम सचिन यांचा मो.नं. ९८९२३७३६८५ यांना माझे मो.क्र. ९८२०७६६६११ वरून कॉल केला परंतू त्यांनी तो उचलला नसल्याने पडताळणी होवु शकली नाही. त्यामुळे तक्रारीची पुन्हा परीस्थितीनुसार म.पो.नि. डोळस यांनी सांगून पडताळणी स्थगित केली.

दिनांक ०६/०४/२०२२ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. सदरवेळी सहायक पोलीस आयुक्त संजू जॉन यांचे प्रकृती खराब झाल्याने ते वैद्यकीय रजेवर असल्याचे मला सांगितले व व त्यांचेऐवजी सहायक पोलीस आयुक्त नितीन जाधव हे परिक्षण अधिकारी म्हणून कामकाज पाहणार असल्याचे मपोनि डोळस मॅडम यांनी सांगितले व त्यांनी माझी भेट सहायक पोलीस आयुक्त नितीन

समक्ष,

(निलीमा डोळस),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

०७/०४/२०२२

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. विनोद गोविंद परब यांचा दिनांक ०७/०४/२०२२ रोजीचा जवाब पुढे चालू.....

जाधव यांचेशी करुन दिली. त्यांनी माझी, पंच व पोलीस पथकाची ओळख करुन घेतली व त्यांनतर मी पडताळणीकामी माझ्या वरील खाजगी वाहनाने, पंच, पडताळणी पथकातील अधिकारी व कर्मचारी शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून पडताळणीसाठी रवाना झालो. आम्ही दादाजी कोंडदेव मार्गावर जिजामात उद्यान, भायखळा, मुंबई येथे रस्त्यालगत कोणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे वाहने थांबविली.

मला व पंच श्री. मनिष जांभळे यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. तेथे पो.ना. यादव यांच्या मदतीने माझे शर्टचे आतील बाजूस बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून लावण्यात आले. त्यानंतर मी व पंच श्री मनिष जांभळे असे लोकसेवकाच्या कार्यालयात भेटण्याकरीता गेलो. तेथे मी प्रथम सॅनिटरी इन्सपेक्टर श्री जावेद काझी यांची भेट घेतली त्यानंतर खाजगी इसम सचिन व त्यानंतर वैद्यकिय अधिकारी श्री. गायकवाड यांची भेट घेतली. श्री जावेद काझी यांनी माझेशी माझ्या प्रलंबित कामाकरीता पुढीलप्रमाणे उत्तरे दिलेली आहेत.

तुम्हारे को फायरका ओ करने का है ना। फायर कंम्पलायनस। मैने नही ए अभी पहिले एन.ओ.सी था ना। तुम्हारा पहिले ओ क्या था। गॅसका करनेका फायरमें भेजने के लिए मेरे को क्या तो भी दो बोलता है। नही... बाबा। तो मै बोला यार ए गलत है ना। मै बोला साब जाने दो ना (अस्पष्ट आवाज) क्या इसको। फ्युअल चेंज करनेका ओ आयेगा करेगा (अस्पष्ट आवाज) उसका काम तो हो जाने दो वहासे। गॅस चाहियेना अभी। डिजल भट्टीका है ओ कॅन्सल करके तुम्हारा फ्युल कर दिया ना। अपनेको भी नही जमता है। तो अपुन क्या बोलू यार। बॉस अफटर बॉस। इस लिए मै चुप बैठ जाता हू। ओ क्या करता। अगर ओ भेज देगाना।, फायर में भी। इधर फायरवालेसे आयेगा। टु कॉपी देगा और एक कॉपी हमको भेजेगा। ऐसा सर्टीफिकीट फायरसे मिलता है। पहिले एन.ओ.सी मिलतीथी अभी ये मिलता है। ये तुम्हारे पास भी फ्रेम बनाके लगानेका। हमारे इसमेंभी रेकॉर्डमें रहेगा।

असे संभाषण झाल्यावर मला खात्री झाली की, माझे काम अजून पुर्ण झालेले नाही. त्यानंतर खाजगी इसम सचिन याचेसोबत मी चर्चा केली तसेच लोकसेवक श्री. गायकवाड यांचे ऑफिसमध्ये पंचामक्ष जात असताना लोकसेवक गायकवाड यांनी पंच मनिष जांभळे यास केबीनच्या बाहेर थांबण्यास सांगितले. व त्यानंतर माझे, खाजगी इसम सचिन तसेच लोकसेवक यांचे कक्षात चर्चा झाली आहे त्यामध्ये लोकसेवक गायकवाड यांनी माझेकडे लाचेची मागणी केली ती पुढिल प्रमाणे आहे.

तुम्ही पण बघा... करून टाका काय असेल ते... करून टाका म्हटलं... याच्याकडे करून टाका... आज संपवून टाकतो मी... करून टाका... आणि... थोडया वेळ थांवा... साडेच्यार वाजता ये सचिन... सचिन.... फायरला.. सर तीन करतायत... त्यावेळी मी लोकसेवक गायकवाड याना बोलो की ' तीनच करू एकदम...' त्यावेळी लोकसेवक श्री.

समक्ष,

(स्वाक्षरी)

(निलीमा डोळस),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(स्वाक्षरी) ०७/०४/२०२२

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. विनोद गोविंद परब यांचा दिनांक ०७/०४/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू.....

गायकवाड म्हणाले की, करून टाका... आणि सांगा काय असेत... फोन करून तेवढ सांगा... त्यावेळी मी पुन्हा बोलो की, 'तीन... तीन कमी नाय का करणार...' त्यावेळी लोकसेवक श्री. गायकवाड म्हणाले की, अहो... नका हे करू... उरकुन टाकू आज मॅटर... असे लाच मागण्याचे वक्तव्य केले.

त्यानंतर मी खाजगी इसम सचिन याला भेटलो व बोलो की, किती हे करायच ते... त्यावर खाजगी इसम सचिन बोलला की, सर बोलले ते आता.. त्यानंतर मी सचिन यास बोललो की ते... अत्ता माझ्याकडे तेवढे नाहीत... त्यावर खाजगी इसम सचिन बोला की नंतर दया... अशा प्रकारे संभाषण झाले'' त्यानंतर मी आणि पंच श्री मनिष असे शासकीय वाहनाजवळ आलो व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. माझेकडे लोकसेवक गायकवाड व खाजगी इसम सचिन यांनी माझे कामासाठी पुन्हा रु.३,०००/—लाचेची मागणी केल्याचे खात्री झाली.

सदर ठिकाणी परत आलेनंतर म.पो.नि. डोळस यांना झालेल्या हकिकतीबाबत विचारणा केली. त्यावेळी लोकसेवक यांनी रू ३,०००/— इतक्या लाचेची मागणी केलेबाबत सांगितले. त्याबाबत व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन त्याबाबत त्यांची खात्री झाल्यानंतर लागलीच सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. नमुद पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची लगेच मागणी केलेबाबत निष्पन्न झाल्याने त्यानंतर सापळा कारवाई तात्काळ करण्यात येणार असल्याची माहिती म.पो.नि डोळस यांनी दिली.

त्यानंतर फिर्यादी यांना सापळापुर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर म.पो.नि. डोळस यांनी मला लोकसेवक गायकवाड यांना दयावयाचे रु. ३,०००/— ( अक्षरी रु. तीन हजार ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे कडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या ०६ नोटा, एकुण रु. ३,०००/— (अक्षरी रु. तीन हजार) त्यांचेकडे दिले. माझी पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. माझ्या शर्टाच्या डावा खिसा वगळून इतर खिश्यामध्ये माझे अंगझडतीत मिळून आलेल्या वस्तु पो.नि. डोळस याचेकडे ठेवल्या. तद्नंतर मी दिलेल्या नोटांचे म.पो.नि. डोळस यांनी मोबाईलमध्ये फोटो काढून घेतले. नंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या दोन्ही बाजूस चालक श्री. चिचोलकर यांनी अँथ्रेसिन पावडर लावून मला त्याबाबत माहिती दिली. सदर रक्कम माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात दोन पंचासमक्ष ठेवली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत म.पो.नि. डोळस यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. तसेच खाजगी इसम सचिन यांनी 'बी' वार्ड बृहन्मुंबई महानगरपालिका, सर जे. जे. हॉस्पीटलच्या समोर, डोंगरी, मुंबई — ०९ येथे लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने मी माझा मास्क घालावा अशी कृती करेन अशी सुचना केली.

तद्नंतर म.पो.नि. डोळस यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, पो.ना. यादव यांच्या मदतीने माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. मनिष लोकसेवक गायकवाड

समक्ष,

(निलीमा डोळस),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

07/04/2022

Scanned with CamScanner

व खाजगी इसम सचिन यांना भेटण्याकरीता त्यांच्या 'बी' वॉर्ड कार्यालयात गेलो. उर्वरीत सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने 'बी' वार्ड कार्यालयात तळमजल्यावर व पहिल्या मजल्यावर उभे राहिले. बी वार्ड बिल्डींग च्या पहिल्या मजल्यावर गेलो असता खाजगी इसम सचिन यास भेटला व त्यावेळी त्याने मला तळमजल्यावरील कॅन्टीनमध्ये घेऊन गेला व सदर कॅन्टीनमध्ये अॅन्थ्रसिन पावरडर लावलेली व थोडयावेळापुर्वी माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम रु.३,०००/—(रु.५००/— दराच्या एकूण ६ नोटा) स्विकारल्या. सचिन याने लाचेची रक्कम स्विकारून त्यांच्या शर्टच्या वरील खिशात ठेवून दिली. त्यानंतर सचिन मला तुमचे फायर एनओसीचे काम लोकसेवक गायकवाड साहेबांना पैसे पोहोचल्याची माहिती देवून लगेच करतो असे सांगून लगेच आम्ही पहिल्या मजल्यावरील लोकसेवक श्री गायकवाड यांच्या कार्यालयात आलो. त्यावेळी सचिन हा माझें व पंचासमक्ष लाच स्विकारलेली रु. ३०००/— रक्कम घेवून लोकसेवक गायकवाड यांच्या केबीनमध्ये मला हाताने बाहेर थांबण्याचा इशारा करुन एकटाच आत गेला व गायकवाड साहेबांशी बोलणी केली त्यानंतर सचिन बाहेर आल्यावर माझे कामाची प्रलंबित फाईल ही ऑफिसमधून त्याने ताब्यात घेतली व सरकारी कार्यालयातील खुर्चीवर बसून त्याने कम्प्युटरवर माझे काम करण्यास सुरवात केली. त्यावेळी मी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने माझा मास्क तोडाला लावण्याची कृती करून पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी तात्काळ पथकातील अंमलदारांनी पुढे येवून खाजगी इसम सचिन यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना जागीच अटकावून ठेवले.

त्यानंतर म.पो.नि. डोळस यांनी पो.ना. यादव यांच्या मदतीने मला बोलावून माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून घेवून तो बंद केला. त्यानंतर लोकसेवक गायकवाड व खाजगी इसम सचिन यांना स्वत:ची ओळख पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर त्यांनी माझ्याकडे दिलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी सांगितले कि, सदरची रक्कम मी खाजगी इसम श्री. सचिन यांना दिली असता त्यांनी ती स्विकारून त्यांचे शर्टाच्या डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यावर खाजगी इसम सचिन यास पंचासमक्ष सापळा पथकातील अधिकारी मपोनि डोळस यांनी माझेकडून स्विकारलेले रु.३,०००/— कोठे ठेवले याबाबत विचारणा केली असता त्याने ते शर्टच्या वरच्या खिशात ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांचे केबीनचे पडदे बंद करुन काळया कपडयाच्या सहायने अंधार करुन पंचासमक्ष अल्ट्राव्हायलेट लाईटच्या प्रकाशात लाचेची रक्कम तसेच खाजगी इसम सचिन याचे हात तसेच शर्टचा खिसा पाहिला असता त्यावर फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसून आले. त्यानंतर सचिन याने दोन पंचासमक्ष लाच म्हणून स्विकारलेले रु.३,०००/— हे मपोनि डोळस यांना काढून दिले. ते त्यांनी ताब्यात घेतले.

लोकसेवक गायकवाड व खाजगी इसम सचिन यांनी प्रस्तुत प्रकरणी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने नमूद पथकाने त्यांना पुढिल कार्यवाहीकरीता ताब्यात घेतले. सदरवेळी पोलीसांनी लोकसेवक व खाजगी इसम यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली आहे.

समक्ष,

(signature)

०७/०४/२०२२

(निलीमा डोळस),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. विनोद गोविंद परब यांचा दिनांक ०७/०४/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू.....

१) संदिप रविंद्र गायकवाड, वय ४६ वर्षे, व्यवसाय – नोकरी (पद – वैद्यकीय आरोग्य अधिकारी, बी वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, सर जे.जे हॉस्पीटलच्या समोर, डोंगरी, मुंबई – ०९, रा.ठि. ११२, म्युन्सिपल कॉलनी, रू.नं. ११, जे.बी. टेमकर मार्ग, वरळी, मुंबई

२) श्री. सचिन महादेव कोकीतकर, वय ३६ वर्षे, व्यवसाय – खाजगी एजंट, रा.ठि. बी/४०५, चौथा मजला, नवीन गौरव सोसायटी, पेंडसे नगर, डोंबिवली (पू), जि. ठाणे असे सांगितले.

तरी वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री. संदिप रविंद्र गायकवाड व खाजगी इसम सचिन कोकीतकर यांनी जुन्या मालकाच्या नावावर असलेले हेल्थ लायसन्स स्वत:च्या नावावर हस्तांतरीत करणे, हॉटेलचे डिझेल इंधन आधारीत भट्टीचे एल.पी.जी मध्ये रूपांतरीत करणे, पत्त्यामध्ये पिन कोड दुरूस्त करण्याकरीता रू.३,०००/– इतकी लाचेची रक्कम पुन्हा मागुन दिनांक ०६/०४/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान रू.३,०००/– रक्कम स्विकारली म्हणून माझी लोकसेवक श्री. संदिप रविंद्र गायकवाड, व खाजगी इसम सचिन कोकीतकर यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री. संदिप रविंद्र गायकवाड व खाजगी इसम सचिन कोकीतकर यांचेशी कोणताही आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

(निलीमा डोळस),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Vinod Govind Parab
07/04/2022

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ पडताळणी वरुन

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

स्विकारलेली लाचेची रक्कम - 3,000/- रुपये

). (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, ठिकाणी व वेळी आरोपी लोकसेवक श्री संदीप गायकवाड खाजगी इसम श्री सचिन कोकीतकर यांनी फिर्यादी यांनी विकत घेतलेल्या हॉटेलच्या त्या मालकाच्या नावावर असलेले हेल्थ लायसन्स फिर्यादीच्या नावावर हस्तांतरित करणे मध्ये डिझेल ईंधन आधारित भट्टीचे एल.पी.जी मध्ये रुपांतरित करणे हॉटेलच्या पत्यामध्ये पिन ड दुरुस्त करण्याकरिता श्री गायकवाड यांनी 5,3000/- लाचेची मागणी करुन खाजगी इसम, सचिन कोकीतकर यांनी लोकसेवक गायकवाड यांचे सांगण्यावरुन रुपये 3,000/- इतकी लाच रक्कम स्विकारली म्हणुन गु.र.क्र 24/2022 कलम 7,7(अ) भ्रष्टाचार प्र. अधिनियम १९८८ अन्वये

3. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दि. गुन्हा नोंद करण्यात आला.
त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरिक्षक निलिमा डोळस

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........

District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant free of cost.

(R.O.A.C.)

07/04/2022

1. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name निलिमा केशव डोळस.

पदनाम Rank पोलीस निरिक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting

Code No. of I. O. ........

5. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 07/4/2022

1. Date and time of submitted to the Court वेळ · 4.00 वा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ', | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| opy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

tachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner